महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

फोन नंबर ०२४०- २४०२४१२-१८ E mail –deangmca@gmail.com

जा.क्र.शावैमरुऔ/शुश्रुषा/COVID-१९/ कंत्राटी /पदभरती/502/२०२१ दिनांक 8 MAR 2021

महत्त्वाचे/तातडीचे

## परिपत्रक (थेट मुलाखत)

**विषय:-** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय,औरंगाबाद येथे कोविड-१९ अंतर्गत अधिपरिचारीका" या पदावर (दि.३१/०५/२०२१ पर्यंत) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती.

**संदर्भ:-**१.स्थानिक निवड समिती, शा.वै.म.व रुग्णालय, औरंगाबाद यांची दि २५/०२/२०२१ ची बैठक

२. दिनांक ०८/०३/२०२१ रोजीची मा.अधिष्ठाता यांच्या समवेत झालेल्या बैठकीतील निर्णय.

३. या कार्यालयाची दिनांक ०७/०५/२०२० रोजीची जाहीरात

सद्यस्थितीत कोव्हिड-१९ चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता रुग्णसेवेकरिता आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. करिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे परिचारीकांची ५० पदे तातडीने भरणे गरजेजे असल्याचे संदर्भिय क्र.०१ व ०२ अन्वये सुचित करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने प्रथम नियुक्ती यादीमधील ०१ ते १५० उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहे. सदर यादीमधुन दि.०९/०३/२०२१ पर्यंत रुजु होणाऱ्या उमेदवाराव्यतिरिक्त रिक्त राहणाऱ्या जागा उर्वरित गुणवत्ता याद्यामधील उमेदवारांना Walk-In-Interview (थेट मुलाखतीसाठी) साठी दिनांक १०/०३/२०२१ रोजी बोलाविण्यात यावे असे संदर्भ क्र.०२ अन्वये सुचित करण्यात आले आहे.

**करिता उर्वरीत गुणवत्ता यादीमधील सर्व उमेदवारांनी दिनांक १०/०३/२०२१ रोजी सकाळी १० ते १२ वाजेदरम्यान महात्मा गांधी सभागृह, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद परिसरात नर्सिंग कौन्सिलकडे केलेल्या नोंदणी प्रमाणपत्रासह हजर राहावे.**

जे उमेदवार सभागृहात हजर राहतील त्यापैकी ठीक १२.३० वाजता FIRST COME FIRST SERVE अशा पध्दतीने मंजुर पदापैकी रिक्त राहीलेल्या पदावर उमेदवारांची निवड करण्यात येईल.

तसेच मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे प्रलंबित असलेल्या परिचारीकांच्या १५० पदांची मान्यता प्राप्त झाल्यास सदर पदे हजर असलेल्या उमेदवारामधुन तातडीने भरण्यासाठी नियुक्ती यादी तयार करण्यात येईल. व तसे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरील परिपत्रक हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,औरंगाबाद या संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
**औरंगाबाद**

प्रत:-अधिसेविका, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

प्रत:-नोटीस बोर्ड,अधिसेविका कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद

REDMI NOTE 7 PRO
AI DUAL CAMERA
2021/3/8 17:41